पिंपरी चिंचवड महानगरपालिका
लेखा विभाग
क्रमांक/लेखा/१ज/६७५५/२०१७
दिनांक : ८ /०८/२०१७

विषय : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ई निविदा प्रक्रिये अंतर्गत निविदा प्रसिध्दी, निविदा लिफाफे उघडणे आणि निविदा तपासणी व स्विकृती याबाबत एकत्रित सुधारित सूचना.

वाचा : १) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय:सीएटी/१०८७/प्र.क्र.८२/इमा-२ दिनांक ५ सप्टेंबर १९८८

२) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय: सीएटी/१०/२०१६ /प्र.क्र.१३३/इमा-२ दिनांक २ नोव्हेंबर, २००६

३) सार्वजनिक बांधकाम नियमावली परिच्छेद २०२, परिशिष्ट ४२

४) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय: बीडीजी/२०१६ /प्र.क्र.२/इमा-२ दिनांक १२ फेब्रुवारी २०१६

५)सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय: बीडीजी/२०१६ /प्र.क्र.२/इमा-२ दिनांक १७/३/२०१६

६) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय:सीएटी/२०१६ /प्र.क्र.१४/इमा-२ दिनांक २७ जुन २०१६

७) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय:सीएटी/२०१६ /प्र.क्र.१२८/इमा-२ दिनांक २८ जुलै,२०१६

प्रस्तावना :-

महापालिकेमध्ये रस्ते, पूल बांधकाम, परिरक्षण व दुरूस्ती तसेच इमारती बांधकाम, परिरक्षण दुरूस्तीच्या अनुषंगाने विविध प्रकारच्या निविदा मागवितांना व सक्षम स्तरावर स्वीकृती करून काम करण्याबाबत विविध सुचना यापूर्वी महानगरपालिकेने निर्गमित आहेत. दिनांक १९ ऑक्टोबर २०१४ च्या शासन निर्णयाद्वारे ई निविदा पध्दतीने मागवून स्वीकृत करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे. Digital India मोहिमेअंतर्गत

महाराष्ट्र शासनाचे जास्तीत जास्त कामकाज ई गर्व्हनन्स पध्दतीने व्हावे व निविदा प्रक्रिया हि ई निविदा प्रक्रीयेने असावी असे धोरण निश्चित करण्यात आले आहे. ई निविदा प्रणालीच्या माध्यमातून येणा-या निविदा, प्रसिध्द होणा-या सुचनांस वैश्विक प्रसिध्दी प्राप्त होत असल्यामुळे सर्वसाधारणत: शासकीय कामकाजामध्ये पारदर्शकता नसल्याचा होणारा आरोप खंडीत होत असल्याचे तसेच ई निविदा प्रणालीमध्ये आवश्यक बाबी ह्या संगणकीय Encrypted digital key आज्ञावलीमध्ये बंदिस्त होत असल्याने त्या गुप्त राहण्याची व सर्व दूर स्पर्धा होण्याची निश्चित शाश्वती होत असल्याने ई निविदा प्रणालीच्या वापरामुळे मोठ्या प्रमाणात शासकीय कामकाजात पारदर्शकता येऊन निरनिराळ्या ठिकाणाहून दबाव येणे किंवा हस्तक्षेप करून कंत्राटदारांना निविदा भरण्यास अडथळे आणणे वगैरे सर्व प्रकार थांबविण्यास मदत झालेली आहे. या सर्व सुचना निरनिराळ्या शासन निर्णयाद्वारे व परिपत्रकाद्वारे यापूर्वी निर्गमित करण्यात आल्या असल्या तरी देखील महापालिकेकडे प्राप्त होणा-या निविदेमधील छाननि व तदनुषगांने आता संपूर्ण निविदाप्रक्रियेचा एकात्मिक विचार करून जुन्या सर्व सूचना अधिक्रमित करून निविदा विषयक कामकाजासाठी नव्याने सूचना निर्गमित करणे क्रम प्रात ठरले आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय, क्रमांक : सीएटी २०१७/प्र क्र ८/इमा-2, दि.१२/०४/२०१७ व शासन शुध्दीपत्रक क्रमांक : सीएटी २०१७/प्र क्र ०८/इमा-2, दि.२९/०६/२०१७ नूसार मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी खालील सर्व बाबींवर एकत्रित सूचना या परिपत्रकाद्वारे निर्गमित करण्यात येत आहे.

१) ई निविदा प्रसिध्दी
२) ई निविदा प्रसिध्दी कालावधी
३) ई निविदा उघडण्यापूर्वी निविदा प्राधिका-याने करावयाची कार्यवाही
४) ई निविदा उघडताना निविदा प्राधिका-याने करावयाची कार्यवाही
५) ई निविदा स्वीकृती

रस्ते, पूल व इमारतींची नवीन बांधकामे, व्यवस्थापन, नियोजन, संकलन, दुरूस्ती, अन्वेषण यासाठी नियुक्त करावयाच्या सल्लागारांच्या निविदा विषयक आदेश या निर्णयात अंतर्भूत नाहीत, यासाठी स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

परिपत्रक :-

महापालिकेची विविध कामे शीघ्रगतीने व्हावी यासाठी यापुर्वीपासूनच ई निविदेचा अवलंब करण्यात येत आहे. याबाबत वर संदर्भात नमुद केलेले शासन निर्णय / परिपत्रके अधिक्रमित करून उपरोक्त ५ मुद्यांबाबत खालील प्रमाणे सुधारीत आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

१) ई निविदा प्रसिध्दी

महानगरपालिकेच्या विविध विभागांची तसेच महानगरपालिकेच्या अधिपत्याखालील रस्ते, पूल, इमारत व इतर अनुषंगिक बांधकामे व अस्तित्वात असलेल्या रस्ते, पुल व इमारतींची दूरूस्ती करण्यात येते. सध्याच्या पध्दतीमध्ये बहुतांश कामे ई निविदा सुचना प्रसिध्द करून प्राप्त निविदेतील निम्नस्तर निविदाकारास / कंत्राटदारास त्याची ई निविदा स्वीकृत करून कार्यारंभ आदेश, ई निविदेतील विविध मुदतीत कामे करण्याच्या अटींसह देण्यात येतो. या सर्व कामांच्या निविदा मागविण्यासाठी शासनाने यापुर्वी शासन निर्णय क्रमांक/सीएटी/१०८७/प्र.क्र.४२/इमा-२, दिनांक ५ सप्टेंबर, १९८८ रोजी सुचना निर्गमित केलेल्या आहेत. तसेच निविदा प्रसिध्दी बाबत सर्व बांधकाम नियमावली परिक्षणामधील तरतुदीप्रमाणे निविदा प्रसिध्दीबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. आता पूर्वीच्या सर्व सुचना अधिक्रमित करून नव्याने खालील प्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहे.

१.१ रूपये ५० हजाराच्या आतील कामांसाठी वृत्तपत्रातून जाहिरात देऊन खरेदी करण्याची अथवा निविदा मागविण्याची आवश्यकता नाही. अशा अतिशय छोट्या कामांसाठी विभागाच्या/महापालिकेच्या नोटीसबोर्डवर निविदा सुचना मराठी / इंग्रजी भाषेतून प्रसिध्द करण्यात यावी व प्रथम सुचनेसाठी आठ दिवस व त्यास प्रतिसाद न मिळाल्यास द्वितीय सुचनेसाठी पाच दिवस एवढा कालावधी ठेवण्यात यावा. सामान्य प्रशासन विभागाच्या विहित मार्गदर्शक सुचनांप्रमाणे ज्या वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करावयाच्या आहेत त्यांचा स्तर खालील तक्त्यांप्रमाणे असावा.

अ. क्र.	कामाची किंमत	प्रसिध्दीचा स्तर			
		जिल्हा स्तर	राज्य स्तर	राष्ट्रीय स्तर	आंतराष्ट्रीय स्तर
१.	रू. ३ लक्ष पर्यंत	मराठी (१ वृत्तपत्र)	वृत्तपत्रात प्रकाशित करावयाची गरज नाही.		
२.	रू.३ लक्ष ते रू.५० लक्ष	मराठी (१ वृत्तपत्र)	मराठी (१ वृत्तपत्र) इंग्रजी (१ वृत्तपत्र)	--------	--------
३.	रू.५० लक्ष ते रू.२५ कोटी	मराठी (१ वृत्तपत्र)	मराठी (२ वृत्तपत्र) हिंदी (१ वृत्तपत्र)	इंग्रजी (२ वृत्तपत्र) हिंदी (१ वृत्तपत्र)	-
४.	रू.२५ कोटी आणि त्यावरील	मराठी (२ वृत्तपत्र)	मराठी (२ वृत्तपत्रे) इंग्रजी (२ वत्तपत्रे) हिंदी (१ वृत्तपत्र)	इंग्रजी (२ वृत्तपत्र) हिंदी (२ वृत्तपत्र)	-
५	रु.१०० कोटी	मराठी (२ वृत्तपत्र) इंग्रजी (२ वत्तपत्रे)	मराठी (२ वृत्तपत्रे) इंग्रजी (२ वत्तपत्रे) हिंदी (२ वृत्तपत्र)	मराठी (२ वृत्तपत्रे) इंग्रजी (२ वत्तपत्रे) हिंदी (२ वृत्तपत्र)	मराठी (२ वृत्तपत्रे) इंग्रजी (२ वत्तपत्रे) हिंदी (२ वृत्तपत्र)

टिप : जिल्ह्यातील wide circulation (जास्त प्रमाणात प्रसिध्द होणारी) असणा-या महत्वाच्या वृत्तपत्रात जाहिराती प्रसिध्द करणे, अनिवार्य राहिल. वृत्तपत्रात द्यावयाची जाहिरात हि प्रपत्र- १ मध्ये नमूद विहित नमुन्यात असावी. यात कुठलाही बदल करण्यात येऊ नये. जाहिरातींची प्रसिध्दी तातडीने होणे आवश्यक असल्यास संबंधितांनी माहीती व

जनसंपर्क अधिकाऱ्यांशी व्यक्तिश: संपर्क साधून तीन दिवसांच्या आत निविदा प्रसिध्द होतील असे पहावे. निविदा सूचना प्रसिध्दी पत्रात प्रसिध्दी विभागाकडे पाठविल्यानंतर तीन दिवसांच्या आत ई निविदा प्रसिध्द झाली नाही तर त्याची कारणे अभिलेखावर ठेवण्यात यावी. ज्या वृत्तपत्रात निविदा सूचना प्रसिध्द झाली आहे ते वृत्तपत्र संबंधित कार्यकारी अभियंता व अधिक्षक अभियंता,सहशहर अभियंता / शहर अभियंता, कार्यकारी विभागाने यांनी निविदा धारिकेस जोडावी. निविदा प्रसिध्द झालेले संपूर्ण वृत्तपत्र (फक्त कात्रण नव्हे) निविदा धारिकेवर उपलब्ध झाले नाही तर, निविदा स्विकत करणा-या सक्षम प्राधिका-यांनी हि बाब धारिकेवर ठेवावी व अशा निविदा पुरेशा प्रसिध्द न झालेल्या समझुन अस्वीकृत करण्यात याव्यात.

१.२ ई निविदा प्रसिध्दी यापूढे www.pcmcindia.gov.in या web portal वर प्रसिध्द कराव्यात. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या कामांसाठी केंद्र शासनाच्या प्रसिध्दी निकषांचे अनुपालन करावे. यापुढे निविदा सुचना pcmcindia.gov.in वरच प्रसिध्द करण्यात याव्यात.

२) ई निविदा प्रसिध्दीचा कालावधी

२.१ निविदा प्रसिध्दीचा किमान कालावधी खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे असावा.

अ.क्र.	कामाची किंमत	प्रथम वेळ	द्वितीय वेळ	तृतीय वेळ
१.	रू.५० हजार	८ दिवस	५ दिवस	आवश्यकतेनुसार तात्काळ
२.	रू.५० हजार ते रू. ३ लक्ष(निविदा www.pcmcindia.gov.in या पोर्टल वर व महापालिका / विभागाच्या नोटीसबोर्डवर प्रकाशीत करावी)	८ दिवस	५ दिवस	३ दिवस
३.	रू.३ लक्ष ते रू.५० लक्ष	१५ दिवस	७ दिवस	७ दिवस

४.	रू.५० लक्ष ते रू.२५ कोटी	२८ दिवस	१५ दिवस	7 दिवस
५.	रू.२५ कोटी आणि त्यावरील	२८ दिवस	१५ दिवस	१० दिवस
६.	रु.१०० कोटी आणि त्यावरील फिडीक ब-२ पध्दत	४५ दिवस	३० दिवस	१५ दिवस

(निविदा कालावधी शासकीय सुटीचे दिवस वगळता प्रत्यक्ष कामाचे दिवस राहतील.)

२.२ निविदा प्रारूप व त्यातील सर्वसाधारण अटी

सद्य:स्थिती प्रचलित B-1 फॉर्म वर अधारीत निविदेमध्ये Speculative दर प्राप्त होत असल्यामुळे खरोखरच अभ्यासपूर्ण स्पर्धा झाली आहे हे स्पष्ट होत नाही. यास्तव रस्ते व इमारतीच्या कामासाठी यापूढे रु.१.५० कोटी रकमेच्या वरील केंद्र शासनाने प्रसिध्द केलेले SBD वर आधारीत बाबी निहाय (item rates) दर असलेल्या B2 निविदा स्थापत्य , विद्यूत, यांत्रिकी व वास्तुशास्त्रीय शाखेच्या कांमासाठी मागविण्यात याव्यात.(B2 निविदा 'ब' प्रभागामध्ये चाचणी तत्वावर दि.०१/०९/२०१७ पासून काढण्यात याव्यात तर दि.०१/१०/२०१७ पासून महानगरपालिकेतील कामांचा १.५ कोटीच्या वरील सर्व निविदा B2 पध्दतीनेच काढण्यात याव्यात) प्रचलित percentage rate वर आधारीत B-1 निविदा रु.१.५० कोटीच्या पेक्षा जादा रकमेच्या मागवू नयेत. ज्या पुलांच्या पायाची निश्चिती स्पष्ट निसंदिग्ध आहे तेथेही केंद्रशासनाने मंजूर केलेले बाबनिहाय (item rates) स्टॅण्डर्ड बिडींग डॉक्युमेंट (SBD) वापरणे अनिवार्य राहिल. अन्य पुलांच्या व विशिष्ट स्वरूपाच्या कामासाठी “C” स्वरूपाच्या lump sum निविदा मसुद्याचा वापर करावा. शासननिर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग दि.१२.०४.२०१७ सोबतच्या SBD मधील पृष्ठ क्र.३ वरील तरतूद क्र.३, अट क्रं.१५.३ मधील ०.२% वाढ देण्याची तरतुद,अट क्र.16.5 व अट क्र.४३.१ वापरण्यात येऊ नयेत. SBD मधील इतर अटी-शर्ती आवश्यकतेनुसार आयुक्तांच्या मान्यतेने वेळोवेळी निर्धारित कराव्यात.

२.३ प्रारूप नविदा मंजूरीचे अधिकार

निविदा प्रारूप मंजूरीचे अधिकार खालीलप्रमाणे प्रदान करण्यात येत आहेत.

कनिष्ठ अभियंता	रु.50,000 पर्यंत
उपअभियंता	रु.50,000 ते रु.300,000
कार्यकारी अभियंता	रू.३ लक्ष ते ५० लक्ष पर्यंत
संबंधीत अधीक्षक अभियंता/सहशहर अभियंता/शहर अभियंता/ विभागप्रमुख	रु.५० लक्षाच्या पुढे

२.४ प्रारूप निविदा प्रपत्रामध्ये सुधारणा करणे.

१. निविदा सूचना प्रसिध्द करण्यापूर्वी प्रारूप निविदा प्रपत्र, सक्षम अधिका-यांकडून मंजूरी प्राप्त करून घेण्यात याव्यात.

२. प्रसिध्द केलेल्या निविदेतील अथवा निविदा सुचनेतील कोणत्याही बाबतीत बदल करण्यात येऊ नयेत. बदल करणे अत्यावश्यक असल्यास खालील तक्त्यात दर्शविलेल्या सक्षम अधिका-यांच्या पुर्व मंजूरीनेच करण्यात यावेत, याची दक्षता घ्यावी. तसेच, अशी मंजूरी प्रदान करतानांची कारणे website वर ठळकपणे प्रसिध्द करावीत.

अ.क्र.	निविदा स्वीकृतीचे अधिकार	मंजूरी प्रदान करणारे सक्षम अधिकारी
1.	कनिष्ठ अभियंता	उपअभियंता
2.	उपअभियंता	कार्यकारी अभियंता
१.	कार्यकारी अभियंता	संबंधीत अधीक्षक अभियंता/सहशहर अभियंता/शहर अभियंता
२.	संबंधीत अधीक्षक अभियंता/सहशहर अभियंता/शहर अभियंता/ विभागप्रमुख	आयुक्त

२.५ निविदा पुर्व बैठक

निविदापुर्व बैठक रु.१.५ कोटीपेक्षा जास्त रकमेच्या प्रत्येक निविदेसाठी आयोजित करण्यात यावी.रु.१.५ कोटीपेक्षा कमी रकमेच्या निविदेकरिता निविदापुर्व बैठक आवश्यकतेनुसार घेता येईल.

अ.क्र.	मुद्दा	सुधारीत कार्यपध्दती
१.	निविदा पुर्व बैठक	निविदा पूर्व बैठक निविदा सादर करावयाच्या अंतिम दिनांकाच्या कमितकमी सात दिवस अगोदर घेणे आवश्यक आहे.
२.	सी.एस.डी.(Common set of deviations) निर्गमित करणे.	निविदा पुर्व बैठकीनंतर ३ दिवसाच्या आत सी.एस.डी.(Common set of deviations) निर्गमित करावी. तसेच सदर सी.एस.डी. .(Common set of deviations) हा निविदेचा भाग राहिल

२.६ निविदा सादर करावयाचे कार्यालय

१.	र.रू.50,000पर्यंत किमतीच्या निविदा	उपअभियंता
२.	रू.५०,००० ते ३००,००० पर्यंतच्या निविदा	कार्यकारी अभियंता
3.	रु.३.०० लक्षा पुढील सर्व निविदा	संबंधीत अधीक्षक अभियंता/सहशहर अभियंता/शहर अभियंता/ विभागप्रमुख

२.७ इसारा रक्कम

ई निविदा पोर्टलवर “बीड लॉक” झाल्यानंतर निविदांबाबत “हार्ड कॉपी” १ प्रतीत कंत्राटदारांनी जास्तीत जास्त ७२ तासांत सादर करणे अनिवार्य राहिल. त्यानुसार लिफाफा क्रं.१ उघडण्याचा दिनांक निविदा सुचनेत नमुद केल्याप्रमाणे ई निविदा प्रक्रियेमध्ये काही अडचण निर्माण झाल्यासच सदर निविदा (Hard Copy) उघडण्यात यावी. तांत्रिक अडथळ्यांमुळे ई निविदा संदर्भात कार्यवाही करणे शक्य झाले नसल्यास

निविदा कागदपत्राच्या प्रती स्वीकारण्यात येऊन त्या ग्राह्य निविदा मानण्यात येतील. परंतु कोणत्याही परिस्थितीत प्रत्यक्षात स्वीकारण्यात आलेली निविदा कागदपत्रे संबंधितास निविदा उघडावयाच्या दिनांक वेळ यांच्या पुर्व सुचना दिल्याशिवाय उघडण्यात येणार नाहीत.

२.८ रूपये १.०० कोटी पेक्षा जास्त रकमेच्या सर्व कामांसाठी खालीलप्रमाणे पोस्ट क्वालिफिकेशन क्रायटेरियाची तरतूद निविदा प्रपत्रकामध्ये ठेवण्यात यावी.

अ.	मागिल ३ वर्षातील कंत्राटदाराची कमाल उलाढाल	देय असलेल्या कामाच्या वार्षिक किमतीच्या कमीत कमी ७५ टक्के इतकी असावी (वार्षिक किंमत = कामाची एकूण किंमत / कामाचा कालावधी वर्षात)
ब	मागिल ३ वर्षात कंत्राटदाराने तुल्यबळ किमतीचे किमान १ त्याच स्वरूपाचे काम पुर्ण केले असले पाहिजे त्याची कमीत कमी किंमत	देय कामांच्या किमतीनुसार (प्रचलित दराने) १. रू.१ कोटी ते रु.१० कोटी : ५०% २. रू.१० कोटी पेक्षा जास्त : ६०% किंवा रू.६ कोटी यापैकी जास्त असणारी किंमत
क	देय कामासाठी मागील ३ वर्षापैकी कोणत्याही एका वर्षात ज्या महत्वाच्या परिमाणांच्या बाबी करावयाच्या आहेत त्याची कमीत कमी परिमाण	देय कामातील महत्वाच्या बाबींच्या परिणामांच्या ५०%
ड	कंत्राटदाराची निविदा भरण्याची सक्षमता (bid capacity)	(A x N x 2) = B जेथे A = गेल्या ३ वर्षातील कमीत कमी वार्षीक उलाढाल (चालू दराने) N = देय कामाचा कालावधी B = हातातील कामांची किंमत (देय कामांच्या कालवधीतील)

इ	देय कामाच्या विशिष्ट स्वरूपानुसार समकक्ष काम कंत्राटदारांनी प्रत्यक्ष केलेले असणे अनिवार्य करण्यात यावे.
	उदा. १. बहुमजली इमारतींच्या बांधकामांबाबत विशिष्ट व वेगळ्या तंत्रज्ञानाचा वापर करणे अपेक्षित असल्याने किमान तळमजला अधिक वरील काही मजले अशा स्वरूपाच्या इमारतींचे बांधकाम (वरील मजल्यांची संख्या क्षेत्रीय स्तरावर विहित करण्यात यावी. २. पाईल फाऊंडेशनचे काम ३. पुलाच्या बांधकामाच्या नियोजित स्वरूपानुसार तशा पुलांचे बांधकाम इ.
फ	देय कामांसाठी कंत्राटदारांकडे उपलब्ध असावयाची स्वत:च्या मालकीची यंत्र सामुग्री व प्रकल्प व्यवस्थापनाबाबतची व्यवस्था याचे निकष निविदा प्रारुप मंजुरी प्राधिकारी यांनी प्रत्येक प्रकरणी तपासणी करून निश्चित करावेत. दि.१५/०८/२०१७ नंतर सर्व कंत्राटदार/पुरवठादारांची नोंदणी (Registration) online करण्यात याव्यात.
ग	रक्कम १.५ कोटी वरील कामांसाठी नोंदणी अनिवार्य करण्यात येऊ नये. कोणताही सक्षम कंत्राटदार या निविदांसाठी अर्ज करू शकेल. त्याची पात्रता त्यांच्या कडे असलेल्या यंत्रसामुग्री Net worth व मागील ३ वर्षात केलेल्या कामाच्या उलाढालीवर ठरवण्यात यावी. यामुळे कामांसाठी स्पर्धा वाढेल व स्पर्धात्मक दर प्राप्त होतील.

२. उलाढाल, कामाची किंमत इत्यादीची परिगणणा चालू दराने करताना प्रती वर्षी १० टक्के वाढ विचारात घेण्यात यावी

३. उपरोक्त (क) नुसार बाबींची निवड करताना देय कामामधील महत्वाच्या व ठळक बाबी विचारात घ्याव्यात.

४. हातातील कामांची उर्वरीत किंमत बिनचूक व परिपूर्णरित्या सादर करणे कंत्राटदारांवर बंधनकारक राहिल. तसेच देय कामांसाठी निविदा सादर केल्यानंतर पण त्यासंबंधी अंतिम निर्णय होण्यापुर्वी एखादे नवीन काम मिळाल्यास त्या संबंधीची माहिती त्वरीत सादर करणे देखील कंत्राटदारांवर बंधनकारक राहिल. अन्यथा नियमानुसार ते यथोचित कारवाईस पात्र राहतील.

५. उपरोक्त (इ) निश्चित करतांना सक्षम कामाची व्याख्या नि:संदिग्ध असण्याबाबत दक्षता घ्यावी.

६.कामाच्या करारनाम्यात पोस्ट क्वॉलिफिकेशनचा क्रायटेरिया समाविशिष्ट केलेला आहे हि बाब निविदा सुचनेमध्ये स्पष्टपणे नमुद करावी.

२.९

२.९.१) निकोप स्पर्धा व्हावी व जास्तीत जास्त स्पर्धात्मक देकार मिळावेत यासाठी खुल्या निविदा सुचना प्रसारित करून निविदा मसूद्यांमध्ये र.रू.१.५ कोटी वरील कामांसाठी निविदा सादर करणारे कंत्राटदार महापालिकेकडे पंजीकृत कंत्राटदार असणे आवश्यक नाही, अशी अट नमुद करण्यात यावी. कुठलाही सक्षम कंत्राटदार निविदेतील अटी व शर्तीची पुर्तता करतील अशी अट नमुद करावी. आंतरराष्ट्रीय कंत्राटदार यांची उपकंपनी भारतीय असल्यास निविदेत भाग घेण्याची अट निविदा सुचनेत समाविष्ट करावी. यास व्यापक स्तरावर प्रसिध्दी देऊन तसेच प्रत्येक निविदेमध्ये सर्व कंत्राटदारांसाठी पात्रता निकष निश्चित करण्यात येऊन सर्व निकषांप्रमाणेच कंत्राटदारांना पात्र /अपात्र ठरविण्यात यावे. तसेच अपात्रतेची कारणे संकेत स्थळावर प्रसिध्द करून अशा अपात्र कंत्राटदारांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी ३ दिवसांच्या कालावधीसाठी देण्यात यावी व क्षुल्लक कारणांमुळे (ज्यांचा उल्लेख ४.५.२ मध्ये नमुद केलेला आहे) कंत्राटदार अपात्र होत असेल तर तत्संबधी आवश्यक त्या निकषांची पुर्तता या निर्धारीत कालावधीत त्यांनी केल्यास त्यांच्या पात्रतेविषयी सक्षम प्राधिका-यांनी निर्णय घेऊन सुधारीत पात्र कंत्राटदारांची यादी संकेत स्थळावर प्रसिध्द करावी व त्यांना निविदा स्पर्धेत भाग घेण्याची परवानगी द्यावी.

२.९.२) महापालिकेमध्ये सल्लागाराच्या नियुक्त्या करणे व त्यांच्याकडून विविध कालावधीत काम करून घेणे अपरिहार्य असल्यास अशा परिस्थितीत सल्लागाराची नियुक्ती करून त्यांना त्यावेळेस शुल्क हे प्रकल्पाच्या टक्केवारीनुसार निश्चित मुल्याचे (Fixed consultancy charges) असे राहील. या निश्चित मुल्याच्या आधारे निविदांमध्ये प्रकल्पाची किंमत कितीही वाढली तरी सल्लागार शुल्क मात्र निर्धारीत केलेल्या मुल्याशिवाय जास्त अदा होणार नाही हि अट प्रकर्षाने नमूद करावी व ती सल्लागारांना बांधील राहिल.

२.९.३) विविध सल्लागारांच्या कामांच्या जाहिराती काढताना या सर्व निविदा सुचनांमध्ये नोंदणी न केलेल्या सल्लागारांनाही निविदेत सहभाग घेता येईल अशी तरतूद करावी. यात सर्व सल्लागारांची पश्चात अर्हता बाबतचे नियम मा.शासनातर्फे स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहेत.सल्लागारांच्या निविदा भारतीय कंपनी / फर्मशी सल्लग्न असलेल्या आंतरराष्ट्रीय सल्लागारांनाही भरता येतील अशी तरतूद निविदेत करावी. वरील प्रमाणे र.रू.१.५ कोटी वरील कामांसाठी स्थापत्य कत्रांटदारांकरीता पंजीकृत नसण्याची अट, विद्यूत यांत्रिकी व वास्तुशास्त्र शाखेच्या कंत्राटदारांकरीता सुध्दा लागू राहील.

२.१०) स्थापत्य, विद्यूत, यांत्रिकी व वास्तूशास्त्रीय शाखेच्या सर्व कंत्राटदारांना SBD निविदांबाबत बाबनिहाय दरपृथ:करणे सादर करणे अनिवार्य राहिल.

२.११) ज्या कामांचा काम पुर्णत्वाचा विहीत कालावधी बारा महीने वा त्यापेक्षा कमी आहे, तसेच मंजुर निविदा रक्कम रु.25,00,000 पेक्षा कमी आहे, अशा कामांना भाववाढीचे कलम लागु राहणार नाही.

३. ई निविदा उडण्यापुर्वी निविदा प्राधिका-याने करावयाची कार्यवाही.

प्रस्तावना :

यापुर्वी ब-याच नामांकित कंत्राटदारांकडून त्यांना निविदा उपलब्ध करून देण्यात आल्या नसल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. आता ई निविदा प्रणालीमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संकेत स्थळावरून कोणताही कंत्राटदार कोठूनही निविदा संच प्राप्त करून घेऊन (download) शकेल व निविदा सादर करू (upload) शकेल तथापि निविदेची विधीग्राह्यता निविदेत नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहील.

३.१ साधारणत: 1.50 कोटीपेक्षा कमी रकमेच्या निविदांमध्ये निविदापुर्व बैठकीची तरतूद नसते. अशा ठिकाणी निविदा उघडण्यापुर्वी ज्या निविदा कारांनी / कंत्राटदारांनी निविदा भरलेल्या आहेत अशा सर्व कंत्राटदारांना निविदा उघडण्याच्या दिनांकाला अथवा लगेचच्या तीन दिवसात कार्यालयात विवक्षित वेळ देऊन बोलवावेत आतापर्यंत पार पाडण्यात आलेली त्या निविदेसंबंधीची सर्व प्रक्रिया हि पारदर्शीपणे झालेली आहे आणि बीड लॉक दिनांकापर्यंत पुर्ण झालेल्या ई निविदा प्रक्रिये संदर्भात निविदा भरणा-या संबंधित कंत्राटदाराची कोणतीही तक्रार नाही, असे प्रमाणपत्र ताबडतोब प्राप्त करून

घ्यावे. असे प्रमाणपत्र देणा-यास उपस्थित कंत्राटदारांनी नकार दिल्यास कारणांची विचारणा करावी व त्यांचे शंकानिरसण करून तसे प्रमाणपत्र सादर करावे मात्र संबंधित कंत्राटदारांचा विरोध अनाठायी व नियमास अनुलक्षून नसेल तर तशी कारणे अभिलिखित करावीत जे कंत्राटदार अनुपस्थित राहिले असतील त्यांची अनुपस्थिती अभिलेखावर नमूद करावी. कार्यकारी अभियंत्यांनी संकेतस्थळांमध्ये निविदा प्रक्रियेत अन्य कुठल्याही व्यक्ती अथवा system integrator / service provider किंवा वेब साईट कोऑर्डीनेटरने कोणताही हस्तक्षेप केलेला नाही व या सर्व प्रक्रियेत सर्व संबंधितांनी सर्वतोपरी योग्य काळजी (due diligence) घेतलेली आहे असे अभिलेखावर नमुद करावे व नंतरच निविदा भरणा-या जास्तीत जास्त कंत्राटदारांच्या उपस्थितीत निविदा उघडाव्यात.

४.ई निविदा उघडताना निविदा प्राधिका-याने करावयाची कार्यवाही,

४.१ कंत्राटदार उपस्थित नसताना निविदा उघडणे हि बाब संशय निर्माण करणारी व पारदर्शकतेला छेद देणारी असल्याने बहुसंख्य कंत्राटदारांच्या उपस्थितीत निविदा उघडणे अनिवार्य आहे काही कारणाने बहुसंख्य कंत्राटदार उपस्थित राहत नसतील तर अशी निविदा उघडणे टाळावे. लिफाफा क्र.१ उघडल्यानंतर त्यातील सर्व कागदपत्रांची छाननी करून पात्र / अपात्र कंत्राटदारांविषयींचे सर्व निष्कर्ष, पात्र /अपात्रतेची सर्व कारणे सर्व संबंधित कंत्राटदारांना कळवावीत व ही सर्व कारणे महापालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावी अशी कारणे प्रसिध्द करण्याची सोय जर निविदा पोर्टल/service provider च्या पोर्टलवर असेल तर तेथेही सर्व कारणे नमूद करावीत विशेषत: ज्या कंत्राटदारांना अपात्र करण्यात आले आहे अशा सर्व कंत्राटदारांना त्यांच्या अपात्रतेची कारणे त्यांना स्पष्टपणे कळविण्यात यावीत अशा रितीने आतापर्यंतच्या निवड प्रक्रियेत संपूर्णपणे पारदर्शकता पाळण्यात आली आहे व निविदा प्रक्रिया विषयी कोणाचीही तक्रार नाही असे कार्यकारी अभियंता अभिलेखावर नमूद करून सर्व / बहूसंख्य कंत्राटदाराच्या उपस्थितीत लिफाफा क्र.२ (निविदा दर विषयक लिफाफा) उघडण्यात यावा. कंत्राटदार उपस्थित नसतील तर कंत्राटदाराशी प्रत्यक्ष संपर्क साधून उपस्थित राहण्यास सुचीत करावे व शक्यतो त्यांच्या उपस्थितीतच लिफाफा क्र.२ उघडण्यात यावा. हि निविदा कंत्राटदार ५ पेक्षा कमी असल्यास किमान २ कंत्राटदारांच्या उपस्थितीत लिफाफा क्र.२ उघडावा ई निविदा कंत्राटदार संख्येने ५ पेक्षा जास्त असल्यास किमान ५ कंत्राटदारांच्या उपस्थितीत लिफाफा क्र.२ उघडावा जेणे करून

कंत्राटदारांच्या समोरच त्यांचे प्राप्त झालेले देकार किती दराचे आहेत हे सर्वांना ज्ञात होईल, हि सर्व प्रक्रिया अनिवार्य राहील व अशा कामकाज पध्दतीमुळे महानगरपालिकेच्या अधिका-यांविषयी विनाकारण संशय घेतला जाणार नाही. काही कारणांमुळे जर कंत्राटदार सुचना देऊनही उपस्थित नसतील तर ३ साक्षीदारांसमोर निविदा उघडण्यात यावी.

४.२ मंडळ स्तरावर प्राप्त होणा-या व उघडल्या जाणा-या निविदांमध्ये निविदापुर्व बैठकीची तरतूद असते अशा निविदा पुर्व बैठकीत जास्तीत जास्त कंत्राटदार उपस्थित राहून ते सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निविदा मसूद्यांविषयी मुद्दे उपस्थित करतील असे पहावे. जर निविदा विकत घेतलेल्या कंत्राटदारांचे (prospective bidder) काही अभिवेदन निविदा पुर्व बैठकीत नसेल तर तसे अभिवेदन त्यांच्याकडून लिखीत स्वरूपात प्राप्त करून घ्यावे व अभिलेखावर जतन करावे. अभिवेदनातील मसुद्यांचे निराकरण किंवा कंत्रांटदाराने उपस्थित केलेले मुद्दे निविदेतील करावयाचा आवश्यक बदल हा सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने ३ दिवसांचे आत करण्यात यावा. सद्य:स्थितीत दृकश्राव्य माध्यम, व्हिडीओ कॉन्फरन्सींग, ई-मेल अशी सर्व संवादाची वेगवान साधने उपलब्ध आहेत त्यामुळे पत्र व्यवहारात वेळ वाया न घालवता या सर्व साधनांचा वापर करून निविदाविषयी CSD तातडीने मंजूर करून घ्यावे व तीन दिवसाच्या कालावधीत Service provider संकेतस्थळावर अपलोड करण्यात यावेत. विषय आयुक्त यांनी या प्रकरणी अनिवार्यता तपासून तत्संबधीची कारणे अधोरेखीत करून जास्तीचा कालावधी मंजूर करावा. काही विवक्षित कारणांमुळे CSD विहित मुदतीत upload करता येत नसतील तर लागणा-या जास्तीच्या कालावधीसाठी आयुक्तांची पूर्वपरवानगी अपवादात्मक परिस्थितीतच घेण्यात यावी. तदनंतर लिफाफा क्र.१ उघडून कंत्राटदारांना बोलावून त्यांची निविदा प्राप्त होई पर्यंतच्या प्रक्रियेमध्ये कुठलीही तक्रार नाही असे प्रमाणपत्र निविदा भरणा-या सर्व कंत्राटदारांकडून प्राप्त करून घ्यावे. तदनंतर लिफाफा क्र.१ उघडावा. लिफाफा क्र.१ मधील सर्व कागदपत्रांची छाननी केल्यानंतर कंत्राटदाराच्या पात्र / अपात्रते विषयीचे निष्कर्ष हे निविदा संकेत स्थळ तसेच www.pcmcindia.gov.in वर प्रसिध्द करण्यात यावे. सर्व पात्र /अपात्र कंत्राटदारांना त्यांच्या पात्र/ अपात्रतेबाबत अवगत करण्यात यावे व त्यानंतरच लिफाफा क्र.२ उघडावा.

४.३ ई निविदा प्रणाली अंतर्गत संपूर्ण पारदर्शकता, योग्य स्पर्धा आणि महापालिकेच्या हितार्थ, निविदा स्विकृतीत एकच निविदा प्राप्त होणे महापालिकेच्या हिताचे नाही. त्यामुळे यापुर्वीच्या एकच निविदा प्राप्त झाली असल्याच्या संदर्भातील सर्व शासन आदेश / सुचना/ निर्णय अधिक्रमित करून खालील आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

बऱ्याच अधिकाऱ्यांना एकच निविदा (Single tender) म्हणजे काय याबाबत संभ्रम असतो याबाबत स्पष्ट करण्यात येते की, एकच निविदा (single tender) म्हणजे निविदा सुचना प्रसिध्द केल्यानंतर फक्त एकच निविदा प्राप्त झाली आहे किंवा बऱ्याच निविदा प्राप्त होऊनही तांत्रिक लिफाफा क्र.१ तपासताना अन्य सर्व कंत्राटदार अपात्र ठरून फक्त एकच कंत्राटदार निविदेसाठी पात्र ठरले आहेत, अशा सर्व निविदा ठेकेदारांना एकच निविदा (Single tender) म्हणून समझण्यात येईल या सर्व एकच निविदा संदर्भात आदेशित करण्यात येते की, अशा प्राप्त झालेल्या निविदा लिफाफा क्र.२ न उघडता तात्काळ फेटाळण्यात याव्यात व लगेचच नवीन निविदा मागविण्यात याव्यात. मात्र यासंदर्भात मुळ प्रारूप निविदेमध्ये कुठलाही बदल करू नये. मुळ प्रारूप निविदेमध्ये कुठलाही बदल न केल्यास नवीन केलेली मागणी ही द्वितीय मागणी समजण्यात येईल. अशा मागणीनंतर जर परत एकाकी निविदा प्राप्त झाली तर ती निविदाही नाकारण्यात येऊन तृतीय निविदा मागविण्यात यावी. (सदर कार्यपध्दती बयाणा रक्कम (EMD) online परत करण्यास सूरूवात झाल्यानंतर म्हणजे १ सप्टेंबर २०१७ नंतर अमलात आणावी, तोपर्यंत आताप्रमाणेच दोन मुदतवाढी द्याव्यात) द्वितीय व तृतीय वेळेला मागविलेल्या निविदेत निविदापूर्व बैठक घेण्याची आवश्यकता नाही. अशा रितीने तृतीय वेळेस मागविलेली निविदा ही जर एकच निविदा प्राप्त झाली व ही निविदा कमी दराची अथवा अंदाजित दराइतकी असेल ती स्वीकारण्यात यावी. प्रचलित दरसुचीपेक्षा जास्त दराची निविदा प्राप्त झाल्यास याबाबत लगतच्या वरिष्ट स्तरावर पूर्ण समर्थनासह निविदा मंजूरीकरीता सादर करावी, जर या निविदा मान्य करण्यासाख्या नसतील तर त्या स्तरावर रद्द करून निविदा अटींची फेरतपासणी करावी.

एकच निविदा का प्राप्त होत आहेत याअनुषंगाने निविदेतील अटी व शर्तीचा अभ्यास करून तसेच ज्या अंदाजपत्रकावर आधारित निविदा मागविण्यात आल्या आहेत, त्या अंदाजपत्रकातील बाबींचा अभ्यास करून व बाबींच्या दराविषयी खात्री करुन आवश्यक असल्यास आयुक्तांच्या मान्यतेने प्रारुप निविदा मसुद्यात आवश्यक तो बदल आणि

कामाची गुणवत्ता खालावणार नाही याची खात्री करुन काही अटी शिथील करण्याबाबत व अंदाजपत्रकीय किंमतीत वाढ दर पुनर्विलोकनामुळे होत असल्यास त्याबाबत आयुक्त निर्णय घेतील. विभागाने हा निर्णय अभिलेख्यांवर ठेवावा तसेच तो महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावा तद्‌नंतर अशा बदलेल्या निविदेस प्रसिध्दी देऊन परत देकार मागविण्यात यावेत.असे देकार प्राप्त झाल्यानंतर जोपर्यंत किमान तीन पात्र कंत्राटदार प्राप्त होत नाहीत,तोपर्यंत पुनःश्च प्रथम ,द्वितीय व तृतीय मागणी करण्यात यावी.अशा रितीने तीसऱ्या फेरनिविदेलाही तिनपेक्षाही कमी देकार प्राप्त झाल्यास निविदा स्वीकृती प्राधिकाऱ्याने देकार उघडण्याचा निर्णय घ्यावा. हयानंतर लिफाफा क्रं.2 उघडल्यानंतर कंत्राटदाराच्या पात्र / अपात्रतेविषयी निर्णय घेण्यात यावा.अशा निविदेचा लिफाफा क्रं. 2 उघडतांना प्राप्त होणार दर हे कंत्राटदाराच्या अभिलेखित करण्यात यावेत व अशा निविदा सक्षम प्राधिकाऱ्याकडे मंजुरीसाठी पाठविण्यात याव्यात.या सर्व सुचना केंद्रिय दक्षता आयोगाच्या प्रचलित सुचना आहेत. यासुचनांप्रमाणेच शासनाने महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीमध्येही आवश्यक त्या सुधारणा केल्या आहेत.

४.४ ई-निविदा प्रणाली अंतर्गत निविदाकारांनी किमान ३ अथवा 3 पेक्षा जास्त निविदा भरल्याचे आढळल्यास ई-निविदा प्राधिकाऱ्याने निश्चित केलेल्या वेळी लिफाफा क्रमांक 1 (तांत्रिक लिफाफा) उघडावा .तांत्रिक लिफाफातीलकागदपत्रांची छाननी करुन किमान १ किंवा २ कंत्राटदार पात्र ठरले तर अशा कामांचा लिफाफा क्रं.2 न उघडता सदर निविदा फेटाळण्यात याव्यात व तात्काळ सदर कामाची फेरनिविदा प्रसिध्द करण्यात यावी. तांत्रिक लिफाफा छाननीसाठीचा (संबंधीत विभागासाठी) कालावधी हा दोन दिवस इतकाच मर्यादित राहील.अशा कामांची फेरनिविदा प्रसिध्द झाल्यानंतर सदर मुळ निविदेच्या अनुषंगाने पात्र कंत्राटदारास निविदा प्रपत्र भरण्याची प्रक्रिया पुन्हा करावी लागेल. अशा रितीने जोपर्यंत 3 कंत्राटदार पात्र ठरणार नाही तोपर्यंत प्रथम,द्वितीय व तृतीय मागणी करण्यात यावी.तृतीय मागणीच्या वेळेस एकच कंत्राटदार पात्र ठरत असेल व ही निविदा कमी दराची अथवा अंदाजित दराइतकी असेल ती स्विकारण्यात यावी.प्रचलीत दरसुचीपेक्षा जास्त दराची निविदा प्राप्त झाल्यास तर निविदेच्या अटी व शर्तीमध्ये आवश्यक ते बदल (अटींमध्ये शिथिलता आणुन) सक्षम अधिकाऱ्याने करावेत व अंदाजपत्रकीय किंमतीत वाढ दर पुनर्विलोकनामुळे होत असल्यास त्याबाबत ते अभिलेख्यावर ठेवावे. प्रथम आलेली एकच निविदा स्वीकृत करावी अथवा फेटाळावी व

तद्नंतर फेरनिविदा सुचना प्रसिध्द करावी अशा रितीने ३ पात्र निविदा उपलब्ध झाल्यानंतर ३ व त्यापेक्षा जास्त निविदा उपलब्ध झाल्यानंतर लिफाफा क्रं.2 (आर्थिक लिफाफा) उघडण्यात यावे.या देकारांची छाननी करुन ते विनाअट असल्याचे आढळून आल्यास निम्नतम दर स्विकृतीचा संबंधित निविदा उघडणारा प्राधिकारी यांनी आवश्यक वाटाघाटी व निविदा पडताळणी समिती सदस्यांचे अभिप्राय घेऊन, निविदा स्विकृती प्राधिकाऱ्याकडे सादर करावेत. अशा प्राप्त होणाऱ्या निविदांचे दर स्पर्धात्मक वाटत नसल्यास निविदा उघडण्याऱ्या अधिकाऱ्यांनी निम्नतम देकार (Lowest offer) सादर करणाऱ्या कंत्राटदाराबरोबर वाटाघाटी करुन दर कमी करण्याचा प्रयत्न करावा.प्राप्त निविदा दर अंदाजपत्रकापेक्षा जास्तीचे असल्यास व कंत्राटदार निविदेचे दर कमी करण्यास तयार नसल्यास त्या फेटाळण्यात याव्यात व तांत्रिक मंजुरी दिलेल्या अंदाजपत्रकांचे पुनर्विलोकन करुन सक्षम प्राधिकाऱ्याने आवश्यकता असल्यास दरविषयक बाबींत दुरूस्ती करुन फेरनिविदा मागविण्यात याव्यात सद्य:स्थितीत शासनस्तरावर व महापालिका स्तरावर प्राप्त होणाऱ्या सर्व निविदा कमी दराच्या प्राप्त होत आहेत. यामुळे सर्व जिल्हयांतील निविदांविषयीचा कल विभागप्रमुखांनी अभिलिखित करावेत व त्यापेक्षा जास्त दराच्या निविदा प्राप्त होत असल्यास त्या स्वीकृत करण्यापुर्वी संबंधित निम्नतम दर देकार कंत्राटदाराशी वाटाघाटी करन निविदा दर वरील मर्यादेत आणण्याचा प्रयत्न करावा असे शक्य न झाल्यास व निविदा पडताळणी समीतीस प्राप्त झालेले दर योग्य वाटत असल्यास तसे त्यांचे अभिप्राय अभिलेखावर ठेवण्यात यावे व तद्नंतर सक्षम प्राधिकाऱ्यानी अशा निविदा स्वीकृत कराव्यात. रु.1.50 कोटीच्या वरील सर्व निविदा B-2 पध्दतीने प्रसिध्द केल्या असल्यामुळे अंदाजपत्रकात दुरुस्ती करणेदेखील सोईस्कर होईल.

4.5 निविदा तांत्रिक लिफाफा क्रं.1 ची छाननी व मुल्यांकन करतांना निविदा उघडणाऱ्या अधिकाऱ्यांनी व निविदा पडताळणी समीतीने घ्यावयाची दक्षता व तद्नुषंगाने सुचना:-

सध्याच्या प्रचलित पध्दतीत निविदा उघडल्यानंतर कार्यकारी विभागाच्या स्तरावरच तांत्रिक लिफाफा क्रं.1 ची छाननी त्यांचे स्तरावरच होऊन लिफाफा क्रं.2 उघडण्याबाबत निर्णयही कार्यकारी विभागच घेतो या पध्दतीत बदल करण्यात येत आहे व यापुढे परिच्छेद 5.1.4 मध्ये नमुद केल्याप्रमाणे निविदा पडताळणी समितीकडुन हया निविदांची पडताळणी होईल.

निविदा पडताळणी समितीने खालीलप्रमाणे काम करावे.

4.5 1. निविदा उघडण्याची सुचना सर्व कंत्राटदारांना द्यावी व त्यांचे उपस्थितीतच निविदा उघडाव्यात जर काही कंत्राटदारांना निविदा उघडण्याचे दिवशी उपस्थित रहाणे शक्य नसेल तर त्यांच्याकडुन त्याबाबत लेखी विनंती अभिलेख्यांवर ठेवावी.मात्र कोणत्याही परिस्थितीत बहुसंख्य कंत्राटदारांच्या उपस्थितीतच निविदा उघडाव्यात.

4.5.2 निविदा पडताळणी समितीने निविदा उघडल्यानंतर त्यांनी निविदेची छाननी करुन यासाठी निविदेच्या पात्रते / अपात्रतेविषयी काही शंका निर्माण झाल्यास ,विशेषत: खालील बाबींवर त्यांनी कंत्राटदारांकडुन स्पष्टीकरण मागविणे अनिवार्य राहील.

१) नोंदणी विषयक कागदपत्रे
२) पॉवर ऑफ एटर्नीबाबतची स्पष्टीकरणे
३) बँक प्रतिभूती हमी मधील त्रुटी
४) कंत्राटदाराना सादर केलेल्या तांत्रिक व आर्थिक विवरणात संदिग्धता व त्रृटी आढळत असल्यास त्याबाबत स्पष्टीकरण
५) पुलाची लांबी व विनिर्देश, समान करणे, इमारतींची उंची व कामाचे गुणवत्ता निकष, रस्ते बांधकामातील कामांचे / बाबींचे परिमाण व शुल्क
६) जॉईंट व्हेंचर (Joint venture) असल्यास त्यासंबंधी करारनाम्यात त्रुटी असणे, प्रमाणिक नसणे, काररनामा नोंदविलेला नसणे, भागिदाराचे शेअर नमुद नसणे.
७) आर्थिक ताळेबंद व विवरणातील त्रुटीबाबतचे स्पष्टीकरण
८) तांत्रिक लिफाफ्यातील सादर केलेले प्रस्ताव / कागदपत्रातील अटी /शर्ती व पत्र व्यवहारातील संदिग्धता, अस्पष्टता इत्यादि.

याबाबत निविदा उघडणा-या सक्षम अधिका-यांनी (कार्यकारी अभियंता/अधिक्षक अभियंता / सहशहर अभियंता/ शहर अभियंता) संबंधित कंत्राटदारास पात्र /अपात्र ठरविण्यापुर्वी त्यांचेबरोबर लिखित स्वरूपात पत्रव्यवहार करावा व कंत्राटदाराकडून लिखित स्वरूपात स्पष्टीकरण घेऊन ते पडताळावे. किरकोळ व महत्व नसलेल्या अटीमुळे निविदाकारास अपात्र करण्यात येऊ नये. अश्या ठिकाणी कंत्राटदाराबद्दल लेखी स्पष्टीकरण घ्यावे व नंतर त्याचे स्पष्टीकरण समितीसमोर ठेवून त्याची छाननी करून कंत्राटदाराच्या निविदा पात्र /अपात्रते विषयी निर्णय घ्यावा. याबाबतचे सर्व अभिलेख

धारिकेत व संकेत स्थळावर ठेवावे व निविदा स्विकृतीसाठी सादर करण्याच्या प्रस्तावात या सर्व पडताळणी पध्दतीचा स्पष्ट उल्लेख करावा.

४.६ अंदाजपत्रकीय दराच्या १० टक्क्यापेक्षा अधीक दराने कमी असलेल्या निविदा प्राप्त झाल्यास त्यांच्या स्विकृती संदर्भात सुधारीत मार्गदर्शक सुचना
४.६.१. निविदा प्रक्रियेमध्ये प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा १० टक्के पेक्षा अधिक दराने कमी असेल तर संबंधित कंत्राटदारांकडून एवढ्या कमी दरात काम करण्याचे नियोजनाबाबत सविस्तर तपशिल निविदा बोलावणा-या अधिकाऱ्याने प्राप्त करून घ्यावा. कंत्राटदाराने दिलेल्या तपशिलाच्या आधारे सदर काम निम्नतम देकाराच्या किंमतीत पूर्ण करता येणे शक्य असल्याची खात्री करून देण्यात यावी.

४.६.२. प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा १० टक्के पर्यंत कमी दरांच्या असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन किमतीच्या १टक्के एवढ्या किमतीची बँकेची प्रतिपुर्ती हमी परफॉर्मन्स सिक्युरीटी म्हणून निविदेच्या लिफाफा क्र.२ मध्ये सादर करावी. तसेच (Scan करून ई-निविदेसोबत सादर करावी) उदा १टक्के ते १० टक्के कमी दर = १ टक्के रक्कम

४.६.३. प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा १० टक्के पेक्षा जास्त दराने कमी असेल तर देकार १० टक्के पेक्षा जेवढ्या दराने आहे तेवढ्या रकमेचा व वरील बाब-२ प्रमाणे बँकेची प्रतिपुर्ती हमी निविदेसोबत लिफाफा क्रमांक २ मध्ये सादर करावी. (उदा.१४ टक्के कमी दर -१० टक्के पर्यंत करीता -१ टक्के व (१४टक्के - १०टक्के) -४ टक्के असे एकूण ५ टक्के) ही रक्कम रूप. १००० पेक्षा कमी असल्यास किमान रूपये १०००/- (एक हजार) ची बँकेची प्रतिपुर्ती हमी सादर करणे अनिवार्य राहिल.(यापैकी पहिल्या १ टक्के ची रक्कम निविदाधारकाने रोख स्वरूपात online भरणे बंधनकारक राहील. त्यापूढील रक्कम तो रोख स्वरूपात (online), bank gaurantee वा इतर स्वरूपात (मान्यता दिलेल्या) भरू शकेल.

४.६.४. बँक प्रतिभुती हमी ही ऐच्छिक असावी. निविदाधारक SBD मधील 16.1 मध्ये नमुद केल्याप्रमाणे देखील सुरक्षा ठेव (1% बयाणा रक्क्म ,2 % SBD मधील 16.1 प्रमाणे वा रोख , 2% देयकातुन कपात,अशी एकुण 5%) व Performance security

guarantee ची रक्कम वरील 4.6.3 मध्ये नमुद केल्याप्रमाणे भरु शकेल ,किंवा रोख रकमेचा देखील भरणा करु शकेल . ४.६.५. बँक प्रतिभूती हमी उपलब्ध करून देणे /बँकेची प्रतिभूती हमी परत करणे व इतर बाबींबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

अ) बँक प्रतिभूती हमी निविदा बोलावणा-या कार्यकारी अभियंता / अधिक्षक अभियंता / सहशहर अभियंता इ.यांच्या नावे असावी.

ब) बँक प्रतिभूती सरकारी /शेड्युल्ड तसेच सार्वजनिक क्षेत्रातील बँकेची असावी.

क) बँक प्रतिभूती हमीची (Performance security deposit रक्कम /सुरक्षा ठेव /) मुदत कामाच्या दोष दायित्व कालावधीनंतर एक महिना कालावधीपर्यंत असावी.

ड) बँक प्रतिभूती हमीची प्रत (बयाणा रक्कम, Performance security deposit ची रक्कम) Scan करून ई निविदा भरताना ठेकेदारांनी अपलोड करावी.

इ) बँक प्रतिभूती हमी (बयाणा रक्कम, Performance security deposit ची रक्कम) सिलबंद लिफाफ्यामधून कंत्राटदारांनी निविदा स्विकृतीच्या दिनांकात कार्यकारी विभागाच्या यांच्या कार्यालयात जमा करावा लिफाफ्यावर कामाचे नाव व निविदा सुचना क्रंमाक लिहण्यात यावा.

फ) निविदा उघडल्यावर लिफाफा क्र.१ मधील कागदपत्रांची पूर्तता न झाल्यास संबंधित कंत्राटदारांना त्यांच्या बँक प्रतिभूती हमीचे (बयाणा रक्कम, Performance security deposit ची रक्कम) लिफाफे कार्यकारी विभाग यांनी निविदा उघडल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांत परत करावेत. बयाणा रक्कम १ सप्टेंबर, २०१७ पासून पूढे (शक्यतो) online परत करण्याची व्यवस्था संगणक विभागाने करावी.

घ) लिफाफा क्र.१ मधील कागदपत्रांची पूर्तता घेऊन ज्या कंत्राटदारांचे लिफाफा क्र.२ मधील देकार उघडण्यात येतील त्या मधील निम्नतम २ निविदाकारांचे बँकेची प्रतिभूती हमी लिफाफे वगळता इतर कंत्राटदारांचे बँकेची प्रतिभुती हमी (बयाणा रक्कम, Performance security deposit ची रक्कम) लिफाफे ७ दिवसांत परत करण्यात यावेत.

च) निम्नतम निविदाकारांना कार्यारंभ आदेश दिल्यानंतर ३ दिवसांत क्र.२ चे निम्नतम निविदाकाराची बँकेची प्रतिभूती हमी (बयाणा रक्कम, Performance security deposit ची रक्कम) परत करण्यात यावी.

छ)	वरील पध्दतीमध्ये खोटी कागदपत्रे / बँक प्रतिभूती हमी सादर करणा-या कंत्राटदारांची अनामत रक्कम (EMD) जप्त करण्यात यावी व संबंधित कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकावे. तसेच अशा काळ्या यादीत समाविष्ट केलेल्या कंत्राटदारांनी सादर केलेल्या निविदा उघडू नयेत.

४.६.६. कार्यकारी विभागाने निम्नतम निविदाकारांकडून प्राप्त बँक प्रतिभूती हमीची(बयाणा रक्कम, Performance security deposit ची रक्कम) मुदत दोष दायित्व कालावधी नंतर एक महिन्यापर्यंत वाढवून घेतल्यानंतरच तसेच कामाचा विमा काढल्यानंतरच कार्यारंभ आदेश देण्याची कार्यवाही करावी तसेच मुदतवाढीचे आदेश व प्रत्येक काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र त्या त्या दिनांकास www.pcmcindia.gov.in या वेबपोर्टलवर upload करावे.

४.६.७. काम समाधानकारकपणे पुर्ण झाल्यावर निविदेतील तरतुदीप्रमाणे ठेकेदारांकडून प्राप्त अतिरिक्त कामगिरी सुरक्षा ठेव रक्कम व बँक प्रतिभूती हमी ३ महिन्याच्या आत कंत्राटदारांना कार्यकारी अभियंता यांनी परत करावी.

5.0 ई-निविदा स्विकृती-

ई-निविदा महानगरपालिकेच्या वेबसाईट,वेब-पोर्टलवर प्रसिध्द् झाल्यानंतर निविदेतील अटी व शर्तींमध्ये अंशत:ही बदल करण्यात येऊ नये. अशा बदलामुळे कंत्राटदार आणी सर्वसामान्य जनता यांच्यामध्ये महानगरपालिकेच्या कार्यपध्दतीबाबत संशय निर्माण होतो.तसेच महानगरपालिकेच्या विश्वासार्हतेला तडा पोचण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे ई-निविदेतील आशय अथवा तारखेत बदल करावयाचे झाल्यास ते सक्षम प्राधिकाऱ्याच्या लिखित पुर्वपरवानगीनेच करण्यात यावेत.अशा मंजुरी प्रदान करीतांना सदरबाबतचे पत्र व त्याची कारणेही संबंधित बेबसाईट तसेच वेबपोर्टल वर ठळकपणे प्रसिध्द करण्यात यावे.

5.1.1 अतिरिक्त् कामगीरी सुरक्षा ठेव रक्कम (Additional performance security deposit) भरणे

कंत्राटदार अंदाजपत्रकीय दराच्या 10 टक्के पेक्षा कमी दर भरल्यास अतिरिक्त इसारा रक्कम / कामगीरी सुरक्षा ठेव रकमेची बँक प्रतिभुती हमी निविदेसोबत सादर करण्याच्या सुचना दिल्या आहेत. निर्धारित रकमेपेक्षा कमी रकमेची बँक प्रतिभुती हमी सादर केल्यास

अथवा आवश्यक बँक प्रतिभुती हमी सादरच न केल्यास सदर कंत्राटदाराची निविदा रदद् करण्यात यावी.

5.1.2 निविदेच्या विधीग्राहयता कालावधी (Validity Period) निविदेतील कंत्राटदाराने भरलेल्या दरासाठी विधिग्राह्यता कालावधी 120 दिवस असावा.

5.1.3 ई-निविदा उघडण्याची प्रक्रिया कार्यालयीन वेळेत करणे-इ-निविदा प्रक्रिया ही महानगरपालिकेने मंजुर केलेल्या ऑनलाईन प्रणालीद्वारे प्रदर्शित करण्यात येते. सदर प्रक्रियामध्ये निविदा कार्यालयीन वेळेत न उघडणे,निविदाधारकांचे अनूपस्थितीत उघडणे अशा तक्रारी होऊ नयेत म्हणुन ज्या निविदाधारकांनी निविदा सादर केल्या आहेत अशा बहुसंख्य निविदाधारकांसमोर निविदा उघडण्याची कार्यवाही करण्यात यावी व अशा निविदा कार्यालयीन वेळेतच उघडण्यात याव्यात. यामुळे निविदा उघडण्याच्या प्रक्रियेमध्ये पारदर्शकता राहिल.

5.1.4 निविदा पडताळणी समीती (Evaluation Committee)

1) रु. 50000/- पर्यंतचे कामांसाठी

1	संबंधीत उपअभियंता	अध्यक्ष
2	संबंधीत विभागाचा लेखाधिकारी	सदस्य सचिव
3.	लेखा विभागाचा लेखापाल	सदस्य

2) रु.50,000 ते 300,000 पर्यंत

1	संबंधीत कार्यकारी अभियंता	अध्यक्ष
2	संबंधीत विभागाचा लेखाधिकारी	सदस्य सचिव
3	लेखा विभागाचा लेखाधिकारी	सदस्य

3) रु.300,000 ते 25,00,00,000/-

1	संबंधीत विभागप्रमुख	अध्यक्ष
2	मुख्यलेखापाल	सदस्य
3	मुख्यलेखापरिक्षक	सदस्य

4) रु.25,00,00,000 च्या पुढे

1	आयुक्त्	अध्यक्ष
2	संबंधीत विभागप्रमुख	सदस्य सचिव
3	मुख्यलेखापाल	सदस्य
4	मुख्यलेखापरिक्षक	सदस्य
5	कार्यकारी अभियंता दक्षता व नियंत्रण	सदस्य

5.1.5 निविदा स्विकृतीचे अधिकार

1	रु. 50,000 पर्यंत	उपअभियंता
2	रु.50,000 ते रु.१०,00,000 पर्यंत	कार्यकारी अभियंता
3	रु.१०,00,000 ते 25,00,000	विभागप्रमुख (अतिरिक्त आयुक्त ,शहर अभियंता / सहशहर अभियंता इ.) वा प्रशासकीय मंजुरी देण्याच्या प्रत्यायोजीत आर्थिक अधिकारांप्रमाणे
4	रु.25,00,000 चे पुढे	आयुक्त

निविदा पडताळणी समीतीने तपासणी करण्याबाबतची सुची प्रपत्र-2 प्रमाणे राहील. सदर समीती आवश्यक असल्यास अन्य अधिकाऱ्यांना आमंत्रित करेल व निविदा स्विकृतीविषयी उचित निर्णय घेईल.

5.2 निविदा स्विकृती संदर्भातील कालमर्यादा:-

जाहिरात प्रसिध्द केल्या नंतर निविदा प्राप्त करुन घेणे,उघडणे,कागदपत्रांची पडताळणी करणे,प्राप्त तक्रारींचे निवारण करणे मंजुर करणे व ठकेदारास LOA देणे इ.कार्यवाहीस वेळेचे बंधन असणे आवश्यक आहे.क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी ही कार्यवाही खाली दिलेल्या तक्त्यानुसार पुर्ण करावी.

अ.क्रं.	कार्यवाही	कमाल निविदा रक्कम व कालावधी (दिवसांमध्ये)			
		रु.1.0 कोटीपर्यंत च्या निविदा	रु.2.5 कोटीपर्यंत च्या निविदा	रु.15 कोटीपर्यंत च्या निविदा	रु.15 कोटीपेक्षा जास्ती च्या निविदा
1	निविदा प्रसिध्द करुन वृत्तपत्रे प्राप्त करुन घेणे.	5	5	5	5
2	लिफाफा क्र.1(लिफाफा) उघडणे	प्रसिध्द केलेल्या निविदेतल वेळ व तारखे प्रमाणे			
3	निविदा प्राप्त होण्याचा किमान कालावधी SBD निविदांसाठी	15	25	45	45
4	निविदा पुर्व बैठकीचा दिनांक (निविदा प्रसिध्द झाल्यानंतंर)	5	10	10	10
5	CSD अपलोड करणे	3	3	3	3
6	लिफाफा क्रं. 1 ची समिती मार्फत पडताळणी करणे	7	10	10	10
7	निविदाधारकांच्या उपस्थितीत मुद्यांचे निराकरण करणे व अंतीम पात्र निविदाधारकांची	3	5	10	10

	यादी तयार करणे .				
8	लिफाफा क्रं.2 (वित्तीय लिफाफा) उघडणे	3	3	5	5
9	निविदा मंजुरीचा प्रस्ताव तयार करुन सक्षम अधिकाऱ्याकडे मंजुरीसाठी सादर करणे	7	7	10	10
10	निविदा मंजुरीची कार्यवाही करणे	15	15	22	27
11	ठेकेदारास प्रतिपुर्ती रक्क्म सादर करण्याचे पत्र पाठविणे	5	5	5	5
12	कंत्राटदाराने प्रतिपुर्ती रक्कम निर्धारित वेळेत न भरल्यास त्याची निविदा रदद् करुन द्वितीय निविदा धारकासमवेत शहानिशा करुन पूढील कार्यवाही करावी.----	10	10	10	10
	एकुण	78	98	135	140

या परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता सर्व संबंधीत विभागप्रमुखांनी स्वत: जातीने लक्ष घालुन घ्यावी.अन्यथा संबंधीत अधिकारी ,कर्मचारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. या परिपत्रकाशी विसंगत सुचना आधिच्या परिपत्रकात असल्यास या परिपत्रकातील सुचनांचे पालन करावे.

आयुक्त